| MHNG180015712025 | - निशाणी क्र. १ वर आदेश (दि.२४ एप्रिल, २०२६) |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, मयत पांडुरंग चिंतामण रोकडे हे अर्जदार क्र. १ पुरुषोत्तम चिंतामणजी रोकडे यांचे भाउ, अर्जदार क्र. २ पंकज नारायण रोकडे व अर्जदार क्र. ३ प्रशांत नारायण रोकडे यांचे काका व अर्जदार क्र. ४ रत्नाबाई नारायणराव रोकडे यांचे दीर असून त्यांचा मृत्यू दिनांक २७.०२.२०१९ रोजी वॉर्ड क्र. १७, ब्राम्हणी, तह. कळमेश्वर, जि. नागपूर येथे राहत्या घरी झाला. मयत श्रीमती दुर्गा पांडुरंग रोकडे या मयत पांडुरंग चिंतामण रोकडे यांच्या पत्नी असून त्यांचा मृत्यू दिनांक २७.०१.२०२३ रोजी झाला. मयत पांडुरंग चिंतामण रोकडे व दुर्गा पांडुरंग रोकडे यांना वैवाहिक संबंधातून एक ही अपत्य प्राप्ती झाली नाही. मृतक दुर्गा पांडुरंग रोकडे यांच्या नावे कळमेश्वर नगर पालिका हद्दीत भनगर भुमापन क्रमांक १२६९, न.प. मालमत्ता क्र. १७०००१८२, १३७/१–w १७, माता मंदीर वॉर्ड, कळमेश्वर ४४१५०१ येथील मकान नमूद आहे. सदर मालमत्तेवर फेरफार घेण्यासाठी अर्जदारांना वारसान म्हणून प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रकरणात अर्जदारातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन करता पुढील मुद्दे या न्यायालयाचे समक्ष आदेशासाठी उपस्थित झाले. ते मुद्दे व त्याबाबत करण्यात आलेल्या चर्चेला अनुसरुन निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे सिद्ध करतात काय की, त्यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत काय ? | : | **होय.** |
| २. | आदेश काय ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता** –

४. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर या अर्जाबाबत नि. क्र. १ वरील आदेशान्वये नोटीस व जाहीरनामा काढण्याबाबत आदेशीत करण्यात आले. त्यानुसार दैनिक वर्तमानपत्र नवराष्ट्र वृत्तपत्रामध्ये नि.क्र. १८ वर जाहीरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदरहु जाहीरनाम्याबाबत आजपावेतो कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविलेली नाही तसेच कोणीही हजर झालेले नाही.

५. अर्जदाराच्या विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा युक्तीवाद नि.क्र. १ प्रमाणे तसेच अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्याप्रमाणे केला. अंतिमतः त्यांनी असे नमूद केले की, आजपावेतो जाहीरनाम्यास कोणीही आक्षेप, उजर व हरकत नोंदविली नाही म्हणून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. अर्जदाराने प्रस्तुत अर्जात केलेली कथने नाकारण्यासाठी कोणत्याही प्रकारची हरकत आजपर्यंत न्यायालयासमोर आलेली नाही. तसेच अन्य कोणताही इसम मृत व्यक्तिंचा वारस असल्याचा दावा करण्याकरीता हजर झालेला नाही, अगर कोणताही आक्षेप, उजर तथा हरकत नोंदविण्यात आलेली नाही.

७. प्रस्तुत अर्जाबाबत अर्जदार क्र. १ पुरुषोत्तम चिंतामणजी रोकडे यांनी साक्षीदार क्र.१ म्हणुन नि.क्र. ८ प्रमाणे स्वतःचा पुरावा प्रतिज्ञापत्रावर सादर केलेले आहे व सदरहू पुरावा आजपावेतो अबाधीत असून त्याला कोणीही आव्हान दिले नाही.

८. अर्जदारांनी पुराव्यासोबत खालील दस्तऐवज दाखल केलेले आहे;–

| अ. क्र. | कागदपत्रांचे विवरण | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | पांडुरंग चिंतामण रोकडे यांच्या मृत्युपमाणपत्राची पडताळीत प्रत | ९. |
| २. | दुर्गाबाई पांडुरंग रोकडे यांच्या मृत्युपमाणपत्राची पडताळीत प्रत | १० |
| ३. | मालमत्ता क्र. १७०००१८२, नगर परिषद कळमेश्वर, ब्राम्हणीची करपावती | ११ |
| ४. | भुमापन क्र. १२६९, मौजा कळमेश्वरचे मालमत्ता पत्रकची पडताळीत प्रत | १२ |
| ५. | मृतक दुर्गाबाई पांडुरंगजी रोकडे यांच्या आधारकार्डची पडताळीत प्रत | १३ |
| ६. | अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आधारकार्डच्या पडताळीत प्रती | १४ ते १७ |
| ७. | दि. ०७.११.२०२५ रोजी दैनिक नवराष्ट्र वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द जाहीरनामा | १८ |

९. उपरोक्त परिस्थितीत प्रस्तुत अर्जदार क्र. १ ते ४ हे मृतक दुर्गा पांडुरंग रोकडे यांचे कायदेशीर वारस आहेत. असा वारस दाखला देण्यास कोणताही अडथळा दिसून येत नाही. करीता मुद्दा क्र.१ साठी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीता –**

**१०.** मुद्दा क्र.१ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदविल्यामुळे मुद्दा क्र.२ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ४ हे ह्या मृतक दुर्गा पांडुरंग रोकडे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र योग्य ते न्यायालयीन शुल्क घेतल्यानंतर देण्यात यावे.

RAVINDRA RATHOD
Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.04.24 15:56:43 +0530

( आर.एल. राठोड)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळमेश्वर, जि. नागपूर.

कळमेश्वर.
दिनांक : २४.०४.२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर. एम. परमाल (ग्रेड – ३)